# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे- ४११ ००५.

O/C = 4697

परिपत्रक क्र.पुविमं/लेखा-१-२/नोंदणी शुल्क/सन २०१८-१९/७६८७ ,पुणे, दिनांक-२६/०६/२०१८

विषय - शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठीची नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क भरणेबाबत.. ..

पुणे विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मंडळ मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालय प्रमुखांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाचे नोंदणी शुल्क खालील नमूद केलेल्या दराने इ.१० वी / इ. १२ वीच्या नियमित विदयार्थी संख्येप्रमाणे नोंदणी शुल्क दिनांक - १० ऑगस्ट, २०१८ पूर्वी विभागीय मंडळाकडे बँक ऑफ इंडियामध्ये दोन स्वतंत्र चलनाव्दारे जमा करण्यात यावेत.

**नोंदणी शुल्क तक्ता**

| दिनांक | तपशील | नोंदणी शुल्क इयत्ता १० वी माध्यमिक शाळा | नोंदणी शुल्क इ . १२वी कनिष्ठ महाविदयालय |
|---|---|---|---|
| दि. १० ऑगस्ट २०१८ पर्यत | १ ते १०० विदयार्थ्याकरीता | रुपये - १०००/- | रुपये - १०००/- |
| | त्यापुढील प्रत्येक १०० विदयार्थ्यासाठी | रुपये - २००/- | रुपये - ४००/- |
| दि. ११ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०१८ | दंडात्मक शुल्क | रुपये - २००/- | रुपये - २००/- |
| दि. ०१ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०१८ | दंडात्मक शुल्क | रुपये - ३००/- | रुपये - ३००/- |
| दि. ०१ ऑक्टोबर नंतर नियमित विदयार्थ्यांची आवेदनपत्र सादर करण्याच्या तारखेपर्यत | दंडात्मक शुल्क | रुपये - ५००/- | रुपये - ५००/- |

## शिक्षण संक्रमण

सर्व माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालयांनी शिक्षण संक्रमण शुल्क रु. २००/- प्रमाणे दिनांक- १० ऑगस्ट, २०१८ पूर्वी विभागीय मंडळाकडे बँक ऑफ इंडिया मध्ये स्वतंत्र चलनाव्दारे जमा करण्यात यावे.

**विशेष सूचना --**

१) दि.१० ऑगस्ट २०१८ नंतर नोंदणी शुल्क भरल्यास वरील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे दंडाच्या रक्कमेसह नोंदणी शुल्क भरणे आवश्यक राहील.

२) चलनातील सर्व माहिती परिपूर्ण भरुन चलनावर विदयार्थी संख्येची नोंद करणे आवश्यक आहे.

३) इ. १० वी / इ. १२ वी साठी फेब्रु/मार्च - २०१९ च्या परीक्षेकरीता प्राप्त होणा-या नोंदणी शुल्काची पडताळणी ही आपण मंडळाकडे सादर केलेल्या नियमित विदयार्थ्यांच्या आवेदनपत्रांच्या संख्येवरुन करण्यात येणार आहे. तेव्हा नोंदणी शुल्क भरताना सदर बाबीची मुख्याध्यापक / प्राचार्यानी नोंद घ्यावी.

४) नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क मंडळाकडे पाठविताना सोबत जोडलेल्या नमुन्यातील प्रपत्रावर माध्यमिक शाळा / क.म. सांकेतीक क्रमांक, इ. १० वी /इ.१२वी नियमित विदयार्थी संख्या, चलन क्रमांक, दिनांक, एकूण रक्कम व बँकेचे नाव इत्यादि बाबी नमूद कराव्यात.

५) अपरिहार्य कारणास्तव चलनाव्दारे शुल्क जमा करता न आल्यासच राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड डाफट किंवा मंडळ कार्यालयात रोखीने शुल्क भरण्यात यावे.

६) ज्या शाळांना माध्यमिक/कनिष्ठ महाविदयालयांचे वर्ग संलग्न असतील अशा माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविदयालयांनी इ. १० वी / इ. १२ वी साठी स्वतंत्र रु. २००/- शिक्षण संक्रमण शुल्क भरणे आवश्यक आहे.

उपरोक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क यांचे चलन / डी डी **दिनांक १० ऑगस्ट २०१८ रोजी वा तत्पूर्वी काढलेला असावा व सदरचे चलन / डीडी दि. १०/०८/२०१८ पर्यत मंडळ कार्यालयात जमा करावेत.** सदर दिनांकानंतरचे चलन व माहितीचा तक्ता दंडात्मक शुल्कासह मंडळ कार्यालयाकडे पाठविण्यात यावा. अन्यथा यासंदर्भात कोणतेही स्मरणपत्र/पत्रव्यवहार न करता मंडळ मान्यता व सांकेतीक क्रमांक रदद करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी

**निर्धारित मुदतीत नोंदणी शुल्क मंडळास प्राप्त न झाल्यास फेब्रु/मार्च- २०१९ परीक्षेचे फी चलन व विदयार्थी यादी स्विकारण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.**

२६/६/१८

विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ, पुणे

प्रति-सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा /कनिष्ठ महाविदयालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य, पुणे/अहमदनगर/सोलापूर

प्रत- आवश्यक त्या कार्यवाहीस्तव-- विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) पुणे/अहमदनगर/सोलापूर

# नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क पाठविण्याचा नमुना

नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्काची माहिती मंडळास सादर करतांना चलनासोबत

इ १० वी / इ १२ वी करीता स्वतंत्र प्रपत्र वापरावे.

| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शाळा सांकेताक | S | | | | | | | | दुरध्वनी /भ्रमणध्वनी | | | | | | | | | | |
| क.म. सांकेताक | J | | | | | | | | | | | | | | | | | | |
| Email ID शाळा | | | | | | | | | Email ID क.म. | | | | | | | | | | |

प्रति,

मा. विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे. विभागीय मंडळ, पुणे.

विषय : नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क भरणेबाबत....
संदर्भ : आपले परिपत्रक क्रं पुविम/लेखा /नों.शु./२०१६-१७ /४०६. दिनांक ३०.०५.२०१६

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन इ. १० वी / १२वी सन २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षाचे शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचे मंडळ मान्यता शुल्क व शिक्षण संक्रमण अंकाच्या शुल्काचे चलन / डि. डि. या सोबत पाठविण्यात येत. असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

नोंदणी शुल्क (इ. १० वी / १२ वी )

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शाळा सांकेताक | S | | | | | | | | |
| क.म. सांकेताक | J | | | | | | | | |

सन २०१६-२०१७ करीता नोदंणी शुल्काचा तपशील

| नियमित विद्यार्थी संख्या | बॅंकेचे नाव | चलन क्र. / डि.डि. /रोख पावती क्रमांक | दिनांक | रुपये |
|---|---|---|---|---|
| | | | | |

शिक्षण संक्रमण अंक शुल्क (इ. १० वी / १२ वी )

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शाळा सार्केताक | S | | | | | | | | |
| क.म. सांकेताक | J | | | | | | | | |

सन २०१६-२०१७ करीता शिक्षण संक्रमण अंक शुल्काचा तपशील

| नियमित विद्यार्थी संख्या | बॅंकेचे नाव | चलन क्र. / डि.डि. /रोख पावती क्रमांक | दिनांक | रुपये |
|---|---|---|---|---|
| | | | | |

स्वाक्षरी
मुख्याध्यापक/प्राचार्य
शाळा/क.महाविद्यालयाचा शिक्का

टिप- इ. १० वी / १२ वी करीता शिक्षण संक्रमण अंकाचे बॅंक ऑफ इंडीयाचे चलन /डि.डि. वेगळेवेगळे पाठवावे.